MHRG08-0002592014 _नियमीत दिवाणी दावा क्र. ४४/२०१४

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ
वि. जयसिंग देशमुख वगैरे

## नियमीत दिवाणी दावा क्र. ४४/२०१४ मधील निशाणी क्र.२४ खालील आदेश

प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी कैफियत सादर करण्यास झालेला विलंब माफ करुन, कैफियत दाखल करण्याची परवानगी मागितली आहे.

०२. प्रतिवादी अर्जात कथन करतात की, त्यांना दि. २२/०४/२०१४ रोजी दाव्याच्या समन्सची बजावणी झालेली आहे. त्याप्रमाणे, प्रतिवादी दि. २०/०६/२०१४ रोजी न्यायालयात हजर झालेले आहेत. परंतु त्यानंतर, दि. ०५ मे ते ०९ जून या कालावधीमध्ये उन्हाळी सुट्टी असल्यामुळे दिवाणी कामकाज बंद होते. त्याशिवाय प्रतिवादी क्र. ३ हे वयोवृध्द असल्यामुळे व कैफियत तयार करण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे उपलब्ध न झाल्यामुळे त्यांना कैफियत मुदतीमध्ये सादर करता आली नाही. त्यामुळे त्यांना ७६ दिवसांचा विलंब झालेला आहे. सबब, प्रतिवादींनी झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मागितली.

०३. वादीने प्रस्तुत अर्जास म्हणणे देवून हरकत नोंदविली आहे. वादीने अर्जातील संपुर्ण कथने नाकारलेली आहेत. वादी असे कथन करतो की, अर्जामधील नमुद कारण हे संयुक्तिक नसून कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब हा अवास्तव आहे. त्यामुळे वादीने जास्तीत जास्त खर्चासह अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०४. उभय पक्षकार व त्यांच्या विधीज्ञांचा पुकारा केला असता, ते गैरहजर राहिलेले आहेत. सदरचा अर्ज ब-याच कालावधीपासुन चौकशीसाठी प्रलंबित आहे. तो चौकशीसाठी बरेच दिवस प्रलंबित ठेवणे न्यायोचित नाही. त्यामुळे अर्ज उभयपक्षकारांच्या युक्तीवादाशिवाय गुणदोषावर आदेश करण्यासाठी ठेवण्यात आला.

०५. प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा वादीने, प्रतिवादींविरुध्द दि. १९/०६/२००१ रोजीच्या करारपत्रावरुन खरेदीपत्र करुन मिळणेसाठी व त्या अनुषंगाने इतर दादींसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना नि.क्र. ८ व ९ अन्वये दि. २२/०४/२०१४ रोजी समन्सची बजावणी झालेली आहे. परंतु, प्रतिवादी मुदतीत कैफियत सादर करु शकलेले नाहीत. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जाद्वारे कैफियत सादर करण्यास झालेला विलंब माफ करुन मागितलेला आहे.

०६. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८, नियम १ प्रमाणे प्रतिवादींना दाव्याचे समन्सची बजावणी झालेपासून ३० दिवसांच्या आत अथवा न्यायालयाच्या परवानगीने जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफियत सादर करता येते. परंतु, प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता, प्रतिवादींना दिनांक २२/०४/२०१४ रोजी समन्सची बजावणी झालेली आहे व प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०८/०८/२०१४ रोजी दाखल केलेला आहे. प्रतिवादींना जवळ-जवळ ७६ दिवसांचा विलंब झालेला आहे. मुदतीचा कायदा कलम ५ प्रमाणे विलंबासाठी संयुक्तीक कारण नमुद करणे आवश्यक असते. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादींनी दि. ०५ मे ते ०९ जूनपर्यंत उन्हाळी सुट्टी असल्यामुळे, तसेच प्रतिवादी क्र. ३ वयोवृध्द असल्यामुळे व आवश्यक कागदपत्रे उपलब्ध न झाल्यामुळे कैफियत मुदतीत सादर करता आली नाही अशी कारणे नमुद केलेली आहेत. परंतु, अभिलेखाचे अवलोकन केले असता, प्रतिवादींना दि. २२/०४/२०१४ रोजी समन्सची बजावणी झालेली आहे. प्रतिवादी दि. २२/०४/२०१४ ते ०५ मे अथवा उन्हाळी सुट्टी संपल्यानंतर लगेचच कैफियत दाखल करु शकत होते. त्यामुळे वर नमुद कारण हे संयुक्तिक कारण वाटत नाही.

०७. त्याशिवाय, प्रतिवादीला कोणती कागदपत्रे उपलब्ध झालेली नव्हती याबाबतचा सविस्तर तपशिल अर्जामध्ये दिलेला नाही. त्यामुळे ते कारण देखील संयुक्तिक कारण वाटत नाही. परंतु, प्रकरणाची गुण-दोषावर निर्गती करण्यासाठी प्रतिवादींना त्यांचा बचाव मांडणेकामी संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे, प्रतिवादींना त्यांची कैफियत सादर करुन देणे मला योग्य वाटते. प्रतिवादींनी विलंबाबाबत संयुक्तीक कारण

दिलेले नाही, त्यामुळे त्यांच्यावर विलंबाचा खर्च ठेवणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१) अर्ज (निशाणी क्र. २४) रक्कम रु.५००/- च्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

२) खर्चाची रक्कम वादीला देण्यात यावी.

३) खर्चाची रक्कम वादीला दिल्यानंतर प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना कैफियत सादर करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

Digitally signed by Pradip Madan Mane
Date: 2020.12.10 16:25:21 +0530

दिनांकः १०/१२/२०२०
खालापूर.

**(श्री.पी.एम.माने )**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
खालापूर.